अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-३०
दुरध्वनी क्र.- ०२२-२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— १६/०४/२०२५

**—: प्रेसनोट :—**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | १६/२०२५ |
| कलम | कलम ७,१२,१३(१)(अ) सह कलम १३(२) लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम (सुधारीत) १९८८ सह कलम १०९,४०३,४०९,४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७७ (अ) भादंवि. |
| आरोपी लोकसेवक | श्री. गजानन कृष्णा लाड, वय ५९ वर्षे, धंदा - नोकरी, पद - राज्यकर अधिकारी, तत्कालीन नेमणूक - (MUM-BCP-C-005) कुर्ला-७०१, घाटकोपर विभाग, नोडल ११, माझगांव, मुंबई व इतर. |
| गैरव्यवहार केलेली रक्कम | **रूपये ४,६९,२९,६३०/—** |
| थोडक्यात माहिती | लोकसेवक नामे श्री. गजाजन कृष्णा लाड, राज्यकर अधिकारी यांचेकडे (MUM-BCP-C-005) कुर्ला-७०१, घाटकोपर विभाग, नोडल ११, माझगांव, मुंबईचा पदभार असतांना मे. इन्टरक्रीब मार्केट (ओपीसी) प्रा.लि या कंपनीने त्यांचे व्यवसायाच्या ठिकाणाची बनावट व खोटे कागदपत्रे सादर करून जीएसटीएन प्राप्त केला. त्यानंतर सदर करदात्या कंपनीने शासनास कोणताही कर भरणा केला नसतांनाही एकुण ४,६९,२९,६३०/- इतक्या किंमतीचे कर परतावा अर्ज सादर केले होते. सदर कर परतावा अर्जावर कर परतावाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची जाणून बुजुन पडताळणी न करता लोकसेवक श्री. गजाजन कृष्णा लाड यांनी सदर कर परतावा अर्ज नामंजुर करण्याऐवजी त्यांचे पदाचा गैरवापर करून नमुद करदात्या कंपनीसोबत संगनमत करून, फौजदारी पात्र कट करून खोटया व बनावट अहवालाद्वारे स्वत:च्या व मे. इन्टरक्रीब मार्केट (ओपीसी) प्रा.लि. या कंपनीच्या फायदयासाठी जी.एस.टी. विभागाच्या विविध परिपत्रकांमध्ये दिलेल्या सुचना, मार्गदर्शक तत्वे व कर परतावा कार्यपध्दतीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून बोगस कंपनीस परतावा मंजूर करून **रू. ४,६९,२९,६३०/-** इतक्या किंमतीचा अपात्र कर परतावा सदर कर देयकाला वितरीत करून शासनाची फसवणुक व आर्थिक हानी केली, म्हणुन तत्कालीन राज्यकर अधिकारी श्री. गजानन कृष्णा लाड तसेच संबंधित परतावा प्राप्त कर व्यापारी, बाजुस नमुद बोगस व्यवहार केलेल्या कंपन्या व सदर व्यवहाराशी संबंधित इतर व्यक्ती यांच्या विरोधात मा. वरिष्ठांच्या पुर्वपरवानगीने लाप्रवि गुन्हा रजिस्टर क्रमांक १६/२०२५, लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम (सुधारीत) १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(अ) सह कलम १३(२) सह कलम १०९,४०३, ४०९, ४२०,४६५,४६७,४६८, ४७१, ४७७(अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शनअधिकारी:-** १) श्री.संदीप दिवाण,अपर पोलीस आयुक्त,लाप्रवि,मुंबई
२) श्री.अनिल घेरडीकर,अपर पोलीस उप आयुक्त,लाप्रवि,मुंबई
३) श्री.राजेंद्र सांगळे,अपर पोलीस उपआयुक्त,लाप्रवि,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काहीमाहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,सरपोचखानवाला मार्ग,वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट-acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप :www.acbmaharashtra.net

(मनिषा झेंडे)
सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.